असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं.एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी १०, २००८/पौष २०, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-ल

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जानेवारी २००८

अधिसूचना

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

क्रमांक युडब्ल्युए. १३९४/(२७६५)/कामगार-५.--(१) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे, किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील किराणा बाजार किंवा दुकाने यातील नोकरी ;

[किंमत : रुपये १५.००]

(२) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विनियमन) अधिनियम, १९६३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बाजारातील किंवा दुय्यम बाजारातील नोकरी;

(३) सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनात माल भरणे किंवा त्यामधून तो उतरविणे व त्या कामाशी आनुषंगिक व संबंधित असेल असे इतर कोणतेही काम यासंबंधातील नोकरी;

(४) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी;

(५) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील या अनुसूचीच्या इतर कोणत्याही नोंदीखाली न येणारी, कामगारांकडून पार पाडण्यात येणारी बाजारातील आणि कारखान्यातील व इतर आस्थापनांतील नोकरी;

(६) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामाच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून त्यासंबंधातील भाजीपाला बाजारातील (कांदे व बटाटा बाजार धरून) नोकरी;

(७) अन्नधान्याच्या गोदामात माल भरणे, तो उतरविणे, आणि त्याची ने-आण करणे, अन्नधान्याचे पृथक्करण करणे व ते स्वच्छ करणे, पोत्यात अन्नधान्य भरणे आणि अशी पोती शिवणे किंवा अशा प्रकारच्या इतर कामांशी आनुषंगिक व संबंधित असेल अशी नोकरी ; अशा नोकऱ्यांसाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (महाराष्ट्र १९६९ चा ३०) च्या कलम ४ चे पोट कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून सल्लागार समितीबरोबर विचारविनिमय केल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे, उक्त कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे उक्त अधिनियमाद्वारे खालील योजना प्रकाशित करीत आहे. ही योजना उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रकाशित करण्यात आली आहे.

योजना

१. **संक्षिप्त नाव.**--या योजनेस यवतमाळ जिल्हा माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००७ असे म्हणावे.

२. **उद्दिष्टे व प्रयुक्ति**-(१) उद्दिष्टये.-नोकरीत असलेल्या असंरक्षित कामगारांचा पुरेसा पुरवठा केला जात असल्याबाबत आणि त्यांचा पूर्ण कार्यक्षमपणे व सुयोग्य पद्धतीने वापर केला जात असल्याबाबत खात्री करणे ही या योजनेची उद्दिष्ट्ये आहेत.

(क) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, तो भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील किराणा बाजार किंवा दुकाने यातील नोकरी ;

(ख) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, तो भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून, अशा प्रकारच्या कामांसंबंधात महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विनियमन) अधिनियम, १९६३ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या बाजारातील किंवा दुय्यम बाजारातील नोकरी;

(ग) सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनात माल भरणे किंवा त्यामधून तो उतरविणे व त्या कामांशी आनुषंगिक व संबंधित असेल असे इतर कोणतेही काम यासंबंधातील नोकरी;

(घ) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी;

(ड) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, तो भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून, अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील या अनुसूचीच्या इतर कोणत्याही नोंदीखाली न येणारी, बाजारातील आणि कारखान्यातील व इतर आस्थापनांतील नोकरी ;

(च) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा आनुषंगिक कामे धरून त्यासंबंधातील भाजीपाला बाजारातील (कांदे व बटाटा बाजार धरून) नोकरी;

(छ) अन्नधान्याच्या गोदामात माल भरणे, तो उतरविणे, आणि त्याची ने-आण करणे, अन्नधान्याचे पृथक्करण करणे व ते स्वच्छ करणे, पोत्यात अन्नधान्य भरणे आणि अशी पोती शिवणे किंवा अशा प्रकारच्या इतर कामांशी आनुषंगिक व संबंधित असेल अशी नोकरी.

(२) **प्रयुक्ति.**-ही योजना संपूर्ण यवतमाळ जिल्ह्याच्या क्षेत्रातील नोंदणीकृत कामगार आणि नोंदणीकृत मालक यांना उप-खंड १ मध्ये उल्लेखिलेल्या अनुसूचीत नोकऱ्यांच्या संदर्भात लागू होईल.

३. **प्रारंभ.**-(१) या योजनेचे खंड (१४) व खंड (१५) अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्यानंतर अंमलात येतील.

(२) उर्वरित खंड अंतिम अधिसूचना प्रसिद्ध झाल्यापासून दोन महिन्यांनंतर अंमलात येतील.

४. निर्वचन.–(क) '' अधिनियम '' याचा अर्थ, महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ असा आहे ;

(ख) '' मंडळ '' याचा अर्थ, यवतमाळ जिल्ह्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ६ अन्वये करण्यात आलेले यवतमाळ जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ असा आहे ;

(ग) '' अध्यक्ष '' याचा अर्थ, मंडळाचा अध्यक्ष असा आहे ;

(घ) '' मासिक कामगार '' याचा अर्थ, मालकाने किंवा मालकांच्या समुहाने कंत्राटावर किंवा मासिक तत्त्वावर नोकरीवर ठेवलेला कामगार असा आहे ;

(ङ) '' कार्य गटातील कामगार '' याचा अर्थ, मासिक कामगार नसणारा, कार्य गटातील नोंदणीकृत कामगार असा आहे ;

(च) '' कार्यगट '' याचा अर्थ, मंडळाने तयार केलेली कामगारांची सूची, परंतु यामध्ये मासिक कामगारांचा अंतर्भाव होत नाही.

(छ) '' आस्थापन अधिकारी '' याचा अर्थ, खंड ५ अन्वये मंडळाने नियुक्त केलेला आस्थापन अधिकारी असा आहे ;

(ज) '' नोंदणीकृत मालक '' याचा अर्थ, ज्या मालकाच्या नावाची तात्पुरती नोंद मालकांच्या नोंदवहीत करण्यात आली आहे, असा मालक असा आहे ;

(ञ) '' नोंदणीकृत कामगार '' याचा अर्थ, ज्या कामगाराच्या नावाची तात्पुरती नोंद कार्यगट कामगारांच्या नोंदवहीत किंवा मासिक कामगारांच्या नोंदवहीत करण्यात आली आहे, असा कामगार असा आहे ;

(त्र) '' मालकाची नोंदवही '' याचा अर्थ, या योजनेखाली ठेवण्यात आलेली मालकांची नोंदवही असा आहे ;

(ट) '' कामगारांची नोंदवही '' याचा अर्थ, या योजनेखाली ठेवण्यात आलेली कामगारांची नोंदवही असा आहे ;

(ठ) '' नियम '' याचा अर्थ, महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) नियम, १९७० असा आहे ;

(ड) '' सचिव '' याचा अर्थ, मंडळाचा सचिव असा आहे ;

(ढ) '' आठवडा '' याचा अर्थ, शनिवारी मध्यरात्री पासून सुरू होणारा आणि पुढील शनिवारी मध्यरात्री संपणारा सात दिवसांचा कालावधी असा आहे ;

(ण) योजनेत वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न दिलेल्या शब्दांचा आणि वाक्यप्रयोगांचा अर्थ अधिनियमात नेमून दिलेल्या अर्थाप्रमाणे असेल.

५. **मंडळाचे सचिव, आस्थापना अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी.**–मंडळ, त्याला योग्य वाटेल, अशा सेवेच्या अटी व शर्तींवर, सचिव, आस्थापना अधिकारी आणि असे इतर अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करील :

परंतु, ज्या पदाचे वेतन, भत्ता वगळता, दरमहा रुपये १,००० किंवा त्याहून अधिक असेल, असे पद निर्माण करण्यात येणार नाही आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता असल्याखेरीज, मंडळ अशा पदावर नेमणूक करणार नाही :

परंतु आणखी असे की, तीन महिन्यांपेक्षा अधिक नाही अशा कालावधीच्या रजा मुदतीत रिक्त पदावर कोणतेही नेमणूक करावयची असल्यास, त्यासाठी राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेची आवश्यकता असणार नाही.

६. **मंडळाची कार्ये.**–(१) खंड २ मध्ये दिलेल्या योजनेच्या अंमलबजावणीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मंडळाला इष्ट वाटतील, अशा उपाययोजना करता येतील, त्यामध्ये पुढील उपाययोजनांचा समावेश होईल :–

(क) काम जलदपणे पूर्ण करणे सुकर व्हावे या प्रयोजनासाठी, नोंदणीकृत कामगारांचा पुरेसा पुरवठा होत आहे आणि त्यांचा पुर्णपणे व यथोचित वापर होत आहे याची खात्री करून घेणे ;

(ख) कामगारांची भरती आणि त्याची योजनेत नोंदणी करणे तसेच योजनेतून त्यांची नोंदणी काढून टाकणे यासंबंधीचे नियमन करणे आणि कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांचे नोंदणीकृत मालकांसाठी वाटप करणे ;

(ग) नोंदवही आणि अभिलेख यावर असलेल्या नोंदणीकृत कामगारांची संख्या वेळोवेळी निश्चित करणे आणि आढावा घेणे व या संखेचे आणि नोंदणीकृत कामगारांच्या संख्येतील वाढ किंवा घट यांचे पुनरीक्षण करणे ;

(घ) मालकांच्या नोंदवह्या ठेवणे, समायोजित करणे आणि अद्ययावत ठेवणे आणि त्यामध्ये कोणत्याही मालकाचे नाव दाखल करणे किंवा पुन्हा दाखल करणे आणि परिस्थितीनुसार आवश्यक असेल तेव्हा, या योजनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नोंदणीकृत मालकाचे नाव नोंदवहीतून काढून टाकणे.

(ङ) जे कामगार कामासाठी तात्पुरते उपलब्ध नसतील आणि ज्यांची अनुपस्थिती मंडळाकडून मान्य करण्यात आली आहे अशा कामगारांच्या कोणत्याही नोंदवह्या किंवा अभिलेख यासह, कोणत्याही कामगारांच्या अशा नोंदवह्या व अभिलेख आवश्यक असतील त्याप्रमाणे वेळोवेळी ठेवणे, ते समायोजित करणे आणि ते अद्ययावत ठेवणे आणि परिस्थितीनुसार आवश्यक असेल तेव्हा कोणत्याही नोंदवहीतून किंवा अभिलेखातून कोणत्याही नोंदणीकृत कामगारांचे नाव त्यांच्या स्वतःच्या विनंतीवरून किंवा या योजनेच्या तरतुदीनुसार काढून टाकणे ;

(च) मंडळ ठरवील अशा गटांमध्ये सर्व नोंदणीकृत कामगारांचे गट करणे किंवा पुनःगट करणे, आणि नोंदणीकृत कामगारांच्या अर्जानुसार, कोणत्याही नोंदणीकृत कामगारांच्या गटाचा आढावा घेणे ;

(छ) जेथवर अशा तरतुदी या योजनेपासून वेगळ्या नाहीत, तेथवर, वैद्यकीय सेवा धरून नोंदणीकृत कामगारांच्या कल्याणासाठी, निधीच्या उपलब्धतेच्या अधीनतेने तरतुदी करणे ;

(ज) नोंदणीकृत मालकांच्या अंशदानातून या योजनेचा खर्च, मजुरी, कर आणि या योजनेखालील इतर अंशदाने यांची वसुली करणे ;

(झ) जेथवर अशा तरतुदी योजनेपासून वेगळ्या नाहीत तेथवर, ज्या जागी कामगारांना कामावर नेमण्यात आले आहे, त्या जागेची आरोग्य व सुरक्षिततेच्या उपाययोजनांसाठी निधीच्या उपलब्धतेच्या अधीनतेने तरतूद करणे ;

(ञ) कामगार कल्याण निधी ठेवणे आणि त्याचा कारभार पाहणे आणि जेव्हा निधीच्या नियमानुसार असा निधी उभारण्यात येतो तेव्हा निधीसाठी सर्व नोंदणीकृत मालकांकडून अंशदान वसूल करणे ;

(ट) जेव्हा असे निधी स्थापन करण्यात येतात तेंव्हा, कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांसाठी भविष्य निर्वाहनिधी आणि उपदान निधी ठेवणे व त्यांचा कारभार पाहणे ;

(ठ) नोंदणीकृत कामगार आणि मंडळाचा कर्मचारी वर्ग यांच्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सहकारी संस्थांना निधीच्या उपलब्धतेच्या अधीनतेने कर्जाच्या रुपाने सहाय्य देणे.

(२) मंडळाकडे विहित करण्यात आलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता या योजनेच्या तरतुदीच्या अधीन राहून व योजनेच्या प्रयोजनांसाठी मंडळ धारण करील आणि ती उपयोजित करील;

(३) मंडळाचा स्वत:चा निधी असेल आणि मंडळ असा निधी ठेवील. या निधीत पुढील रकमा जमा करण्यात येतील :--

(क) राज्य शासनाकडून मंडळाला प्राप्त झालेला सर्व पैसा ;

(ख) या योजनेखाली मंडळाला प्राप्त झालेली सर्व फी, मजुरी आणि वसुली ;

(ग) मालमत्ता आणि इतर मत्ता यांची विक्री व विल्हेवाट याद्वारे मंडळाला प्राप्त झालेला सर्व पैसा ;

(घ) प्रतिभूती, ठेवी व भाडी आणि अन्य कोणत्याही प्रकारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने मंडळाला प्राप्त झालेला सर्व पैसा यांच्या गुंतवणुकीवरील व्याज.

(४) निधीचा भाग असलेला सर्व पैसा स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा कोणतीही अनुसूचीत बँक यातील चालू किंवा बचत खात्यात ठेवण्यात येईल किंवा मंडळ मान्य करील अशा प्रतिभूतीमध्ये गुंतवण्यात येईल. मंडळ प्राधिकृत करील असे मंडळाचे अधिकारी, अशा खात्याचे व्यवहार पहातील : परंतु, मंडळाला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, १००० रुपयांपेक्षा अधिक नाही एवढी रक्कम ...कडे ठेवील.

स्पष्टीकरण.--या उपखंडाच्या प्रयोजनासाठी, " अनुसूचीत बँक " म्हणजे, बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) च्या पहिल्या अनुसूचीच्या ...२ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही बँक.

(५) राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने मंडळ, स्वत:ची साधनसंपत्ती पर्याप्त करण्याच्या दृष्टीने खुल्या बाजारातून कर्ज किंवा अन्यथा पैसे कर्जाऊ घेईल.

(६) ज्या व्यक्ती, प्राधिकारी किंवा आस्थापना यांच्याशी मंडळाला व्यवहार करावयाचा आहे, अशापैकी कोणत्याही व्यक्तीकडून, प्राधिकाऱ्याकडून किंवा आस्थापनाकडून, अशा ठेवी मंडळाला योग्य वाटेल अशा शर्तीवर ते स्वीकारतील.

(७) या योजनेत तरतूद केली असेल अशा राखीव आणि इतर मूल्य निर्देशित निधीची मंडळ तरतूद करील.

(८) मंडळाचा सर्वसाधारण निधी किंवा यथास्थिति, राखीव व इतर निधी यामधून या योजनेखाली प्राधिकृत केलेल्या प्रयोजनासाठी मंडळाला योग्य वाटेल अशी रक्कम खर्च करण्याचा प्राधिकार मंडळाला असेल.

(९) ही योजना चालवण्याचा खर्च आणि योजनेखालील सर्व जमा व खर्च यांचा योग्य हिशेब मंडळ ठेवील.

(१०) मंडळ राज्य शासनाला,--

(क) प्रत्येक वर्षी एप्रिलच्या एक तारखेनंतर आणि ऑक्टोबर ३१ तारखेपूर्वी शक्य तितक्या लवकर लेखापरीक्षित ताळेबंदासह ३१ मार्च रोजी संपणाऱ्या मागील वर्षातील, योजनेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, आणि

(ख) मंडळाच्या बैठकीच्या कार्यवृत्ताच्या प्रती सादर करील.

(११) मंडळ,-

(क) विविध प्रवर्गाखाली नोंदणी करावयाच्या कामगारांची संख्या निश्चित करील.

(ख) नोंदवहीच्या आणि अपेक्षित आवश्यकतांच्या नियतकालिक परीक्षणानंतर आवश्यक वाटल्यास, नोंदवहीतील कोणत्याही प्रवर्गातील कामगारांची संख्या वेळोवेळी वाढवील किंवा कमी करील.

(ग) विनिर्दिष्ट कालावधीसाठी कोणत्याही प्रवर्गातील कामगारांच्या विनिर्दिष्ट संख्येची अस्थायी नोंदणी मंजूर करील ;

(घ) नमुने, अभिलेख, नोंदवह्या, विवरणपत्रे आणि योजनेच्या अंमलबजावणीसाठी अशाच इतर आवश्यक गोष्टी तयार करील ;

(ङ) नोंदणीकृत कामगारांचे सेवानिवृत्तीचे वय, तसेच त्यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती निश्चित करील ;

(च) खंड ४१ (१) खाली वसुलीचा दर निश्चित करील ;

(छ) वार्षिक अर्थसंकल्प मंजूर करील ;

(ज) खंड ५ च्या तरतुदीच्या अधीनतेने सचिव, आस्थापना अधिकारी आणि इतर अधिकारी व मंडळाचा इतर कर्मचारी वर्ग यांची नियुक्ती करील ;

(झ) योजनेमध्ये कोणतेही फेरबदल करण्यासंबंधी राज्य शासनाकडे शिफारस करील ;

(त्र) नोंदणीकृत मालक व नोंदणीकृत कामगार यांच्यातील विवाद मिटवील ;

(ट) कामगारांच्या कामाच्या आकडेवारीबाबत आणि पूर्ण झालेल्या कामाबाबत चर्चा करील आणि ती चर्चा, त्यासंबंधीची निरीक्षणे व निदेश यांची नोंद ठेवील ;

(ठ) मंडळ, त्याला योग्य वाटतील अशा शर्तीच्या अधीनतेने समितीचा अध्यक्ष, सचिव किंवा मंडळाचा कोणताही अधिकारी यांच्याकडे, या योजनेखालील कार्यापैकी कोणतेही कार्य लेखी सोपवील.

(१२) नोंदीत महिला कामगारांचे लैंगिक शोषण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे व लैंगिक सतावनुकीशी संबंधित तक्रारीचे निवारण करण्यासाठी उपाययोजना करणे.

टीप.–या खंडाच्या उद्देशासाठी लैंगिक छळवादामध्ये अशोभनीय अशा हेतूपूर्वक लैंगिक वर्तनाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष याचा समावेश होतो जसे–

(१) शारीरिक संपर्क आणि कामोद्यापीक चेष्ठा; किंवा

(२) लैंगिक सौख्याची मागणी अथवा विनंती; किंवा

(३) लैंगिक वासनाप्रेरीत करणारे शेरे; किंवा

(४) अश्लील साहित्याचे प्रदर्शन; किंवा

(५) कोणत्याही अन्य अशोभनीय, शारीरिक अथवा तोंडी अशवा सांकेतिक आचरण.

७. **वार्षिक अंदाज.**––प्रत्येक वर्षी फेब्रुवारी महिना संपण्यापूर्वी घ्यावयाच्या विशेष बैठकीत, अध्यक्ष, १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या वर्षाकरिता तसेच योजनेचे वार्षिक अंदाजपत्रक आणि वेळोवेळी, मंडळ विनिर्दिष्ट करील, असा तपशील आणि असे नमुने सादर करील. अशाप्रकारे सादर केलेला अंदाज मंडळ विचारात घेईल आणि सादर केल्यापासून चार आठवड्यांच्या आत, त्यामध्ये फेरफार न करता किंवा त्याला योग्य वाटतील असे फेरफार करून त्याला मंजुरी देईल.

८. **अध्यक्षाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये.**––मंडळाच्या कोणत्याही अधिकारांना आणि मंजुरींना बाध येऊ न देता, योजनेची समाधानकारक अंमलबजावणी करण्यास, अध्यक्ष सर्वसाधारणपणे जबाबदार असेल ; आणि मंडळाच्या निर्णयाची, त्याच्या निदेशाच्या अधीनतेने अंमलबजावणी करण्याचा आणि विशेषतः पुढील गोष्टी करण्याचा त्याला अधिकार असेल,–

(क) कामगारांच्या नोंदवह्यांच्या समायोजनासंबंधी मंडळाच्या निर्णयाचे शीघ्रतेने पालन करण्यात येत आहे याची खात्री करणे ;

(ख) कामगारांची तात्पुरती नोंदणी करण्यासाठी लागणाऱ्या मंजुरीचे विनाविलंब पालन होत आहे, याची खात्री करणे ;

(ग) योजनेच्या कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे ;

(घ) अध्यक्षाला कामात कोणतीही अनियमितता दिसून आली किंवा त्याच्या निदर्शनास आणून दिली गेली तर, योग्य उपाययोजना करणे ;

(ड) कामगारांची बदली आणि बढती यांच्यासंबंधी योजनेच्या तरतुदीचे योग्य पालन करण्यात येत आहे याची खात्री करणे ;

(च) आवश्यकता असेल तेव्हा वैद्यक मंडळ घटित करणे ;

(छ) मालकांच्या नोंदणीसाठी योजनेत घालून देण्यात आलेल्या शर्तींचे त्यांच्याकडून पालन करण्यात येत आहे याची खात्री करणे ;

(ज) मंडळाकडून तयार करण्यात आलेले सर्व नमुने, नोंदवह्या, विवरणपत्रे आणि दस्तऐवज, योग्यरित्या ठेवण्यात येत आहेत याची खात्री करणे ;

(झ) कामगारांच्या उत्पादनासंबंधी योग्य आकडेवारी संकलित करण्यात येत आहे आणि मंडळाला योग्य वाटेल अशा कालांतराने योग्य शेरे व स्पष्टीकरणे यांसह मंडळापुढे ती सादर होत आहे याची खात्री करणे ;

(ञ) ज्या पदाचे मासिक वेतन, भत्ता वगळून जास्तीतजास्त रुपये १,००० पेक्षा कमी आहे अशा पदांची निर्मिती करण्यास मंजुरी देणे आणि अशा पदांवर नेमणुकी करणे ;

(ट) या योजनेच्या तरतुदीनुसार नोंदणीकृत कामगार व नोंदणीकृत मालक यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करणे ;

(ठ) " मंदगती काम " सुरू झालेले आहे असे घोषित करणे आणि या योजनेखाली प्राधिकृत केल्यानुसार कारवाई करणे ;

(ड) या योजनेत तरतूद केल्याप्रमाणे, नोंदणीकृत मालक किंवा नोंदणीकृत कामगार यांच्या विनंतीवरुन, मासिक कामगाराची कार्यगटाकडे बदली मंजूर करणे ;

(ढ) नोंदणीकृत कामगार व नोंदणीकृत मालक यांच्याकडून आलेल्या अपिलांवर खंड ३७ व ३८ अन्वये कार्यवाही करणे ;

(ण) खंड ३४ अन्वये परवानगी देण्यात आलेल्या मर्यादेपर्यंत, नोंदणीकृत मालक व नोंदणीकृत कामगार यांच्याविरुद्ध शिस्तभंगाच्या कार्यवाहीसंबंधीची सर्व कर्तव्ये पार पाडणे.

९. **सचिवाची कर्तव्ये.**––सचिव, या योजनेनुसार त्यांच्यावर सोपविण्यात आलेली कर्तव्ये, मंडळ आणि अध्यक्ष यांचे अधिकार व कर्तव्ये यांना बाध येऊ न देता पार पाडील आणि विशेषतः खालील गोष्टींना तो जबाबदार असेल :–

(क) मालकांची नोंदवही ठेवणे, ती समायोजित करणे आणि वेळोवेळी ती अद्यावत ठेवणे, त्यामध्ये कोणत्याही मालकाच्या नावाची नोंद करणे किंवा पुन्हा नोंद करणे, आणि जेथे आवश्यकता असेल तेथे या योजनेच्या तरतुदीनुसार कोणत्याही नोंदणीकृत मालकाचे नाव नोंदवहीतून काढून टाकणे ;

(ख) जे कामगार कामासाठी तात्पुरते उपलब्ध नसतील आणि ज्यांची अनुपस्थिती मंडळाकडून मान्य करण्यात आली आहे. अशा कामगारांच्या कोणत्याही नोंदवह्या किंवा अभिलेख यांसह कामगारांच्या आवश्यक असतील अशा नोंदवह्या किंवा अभिलेख वेळोवेळी ठेवणे, त्यांचे समायोजन आणि परिरक्षण करणे आणि परिस्थितीनुसार आवश्यक असेल तेव्हा कोणत्याही नोंदवह्यांमधून किंवा अभिलेखांमधून, कोणत्याही नोंदणीकृत कामगाराचे नाव त्याच्या स्वतःच्या विनंतीवरुन किंवा या योजनेच्या तरतुदीनुसार काढून टाकणे ;

(ग) जेव्हा नोंदणीकृत कामगार या योजनेनुसार अन्यत्र नोकरीवर नसतात व कामासाठी उपलब्ध असतात तेव्हा अशा कामगारांना नोकरी देणे आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे ;

(घ) मंडळाकडून मिळालेल्या सूचनांनुसार मंडळ निर्धारित करील अशा गटांमध्ये नोंदणीकृत कामगारांचे योग्य कार्यगटांमध्ये गट करणे किंवा पुन्हा गट करणे ;

(ङ) नोंदणीकृत मालकाच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांचे वाटप करणे, आणि, यासाठी सचिव पुढील बाबी करील,--

(एक) कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांचा पुरेपूर वापर करील ;

(दोन) नोंदणीकृत कामगारांची हजेरी केंद्रे किंवा नियंत्रण ठिकाणे येथे उपस्थितीची नोंद ठेवील ;

(तीन) नोकरी आणि नोंदणीकृत कामगारांची कमाई यांचे अभिलेख ठेवण्याची तरतूद करील;

(चार) खंड २३ मध्ये नेमून दिल्याप्रमाणे राखीव कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांची उपस्थिती पत्रके व वेतनचिठ्ठ्या यांमध्ये आवश्यक त्या नोंदी करील किंवा करवून घेईल ;

(च) (एक) या योजनेखाली मालकांकडून पट्टी, कर इत्यादींची किंवा इतर कोणत्याही अंशदानाची वसुली करील ;

(दोन) या योजनेखाली स्थापन करण्यात आलेल्या भविष्यनिर्वाह निधी, आयुर्विमा निधी किंवा इतर कोणताही निधी यांमध्ये अंशदानासाठी नोंदणीकृत कामगांराकडून वसुली करील ;

(तीन) नोंदणीकृत मालकाकडून कायदेशीररीत्या देय असलेली सर्व कमाई प्रत्येक नोंदणीकृत रोजंदारीवरील कामगाराला देईल आणि या योजनेच्या तरतूदींनुसार मंडळाकडून अशा नोंदणीकृत कामगाराला देय असलेली सर्व रक्कम देईल;

(छ) मंडळ किंवा अध्यक्ष यांच्याकडून नियुक्ती करण्यास प्राधिकृत करण्यात येईल त्याप्रमाणे, अर्थसंकल्पाच्या तरतुदींच्या अधिनतेने अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची वेळोवेळी नियुक्ती करील.

(ज) ही योजना कार्यान्वित करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचे आणि त्याखालील सर्व जमा व खर्च यांचे योग्य लेखे ठेवील आणि मंडळाकडे वार्षिक अहवाल व लेखापरीक्षित ताळेबंद व नफातोट्याच्या हिशोबाचा तक्ता सादर करील;

(झ) प्रत्येक वर्षी १५ फेब्रुवारी रोजी किंवा त्यापूर्वी मंडळाकडे सादर करण्यासाठी वार्षिक अर्थसंकल्प तयार करील;

(ञ) सर्व नोंदणीकृत कामगारांच्या सेवेचे पूर्ण अभिलेख आणि सर्व नोंदणीकृत मालकांच्या अभिलेखपत्रिका ठेवील;

(ट) कार्यगटात काम करण्यासाठी नोंदणीकृत कामगार उपलब्ध नसल्यास, किंवा अध्यक्ष मान्यता देईल अशा इतर परिस्थितीत नोंदणी न झालेल्या कामगारांची सेवा प्राधिकृत करील; आणि

(ठ) मंडळ किंवा अध्यक्ष, या योजनेच्या तरतुदींच्या अधिन राहून वेळोवेळी जी कामे नेमून देईल अशी कामे करील.

१०. **आस्थापना अधिकाऱ्यांची कामे .**––सचिवाला त्याची कर्तव्ये पार पाडण्यास आस्थापना अधिकारी मदत करील, आणि विशेषत : या योजनेच्या खंड ३४ अन्वये त्याला नेमून देण्यात आलेली कामे करील.

११. **नोंदवह्या ठेवणे.**––(१) मालकांची नोंदवही मंडळाने ठरवून दिलेल्या नमुन्यात मालकांची नोंदवही असेल आणि त्यामध्ये या योजनेखालील नोंदणीकृत मालकाची नावे व पत्ते नोंदण्यात येतील;

(२) कामगारांची नोंदवही मंडळाकडून नोंदणी करण्यात आलेली कामगारांची नोंदवही असेल आणि त्यामध्ये या योजनेखालील नोंदणीकृत कामगारांची नावे व पत्ते नोंदण्यात येतील. ही नोंदवही योग्यरित्या ठेवण्यात येईल;

(३) कामगारांची मासिक नोंदवही प्रत्येक मालकाने कंत्राटावर आणि मासिक नियुक्तीच्या आधारावर कामावर ठेवलेल्या आणि मासिक कामगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामगारांची ही नोंदवही असेल;

(४) कार्यगट नोंदवही मासिक नोंदवहीखेरीज कार्यगट कामगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कामगारांची एक नोंदवही असेल. या नोंदवहीत गटांनी (गँग) प्रासंगिक रिक्त पदे भरण्यासाठी कोणत्याही गटाशी (गँग) संलग्न नसणाऱ्या कामगारांच्या उप कार्यगटांचा समावेश असेल. अशा उप कार्यगटात समाविष्ट असलेल्या कामगारांना '' रजा राखीव कामगार '' म्हणून ओळखण्यात येईल.

१२. **कामगारांचे वर्गीकरण.**––मंडळ वेळोवेळी मंडळाकडून, निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे योग्य प्रवर्गामध्ये नोंदणीकृत कामगारांचे वर्गीकरण करण्यासाठी व्यवस्था करील.

१३. **नोंदवहीवर कामगारांची संख्या निश्चित करणे.**––कोणत्याही प्रवर्गातील नोंदणीला सुरूवात करण्यापूर्वी नोंदणीकृत मालकांशी विचारविनिमय करून त्या प्रवर्गात आवश्यक असलेल्या नोंदणीकृत कामगारांची संख्या मंडळ निर्धारित करील.

१४. **कामगारांची नोंदणी.**––ही योजना लागू असणाऱ्या क्षेत्रामधील एखाद्या सेवा योजनेतील प्रतिनिधी म्हणून विक्री, खरेदी किंवा व्यापार किंवा कार्य करणे या कामांमध्ये असलेला मुकादम, कमिशन एजंट, निपटारा एजंट, खरेदीदार, आयातक, निर्यातक यासह प्रत्येक मालक, हा खंड अंमलात आल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत या योजनेला जोडलेल्या नमुना '' क '' मध्ये अर्ज करून मंडळाकडून नोंदणी करवून घेईल : परंतु या योजनेच्या प्रारंभानंतर अस्तित्वात येणाऱ्या एखाद्या आस्थापनेचा मालक त्याच्या कामकाजाला सुरूवात केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत नोंदणीसाठी अर्ज करील ;

१५. **विद्यमान आणि नवीन कामगारांची नोंदणी.**––(१) (क) ही योजना लागू असलेल्या क्षेत्रात या योजनेची सुरुवात होण्याच्या तारखेस, सेवायोजनात यापूर्वीच काम करीत असलेला प्रत्येक कामगार, या योजनेखालील नोंदणीकृत कामगार असेल ;

(ख) स्थानिक परिस्थिती, शारीरिक पात्रता, क्षमता आणि/किंवा अनुभव लक्षात घेता, मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अर्हतेवर नवीन नोंदणी करण्यात येईल. केवळ भारताचा नागरिक अशा नोंदणीसाठी पात्र असेल;

(ग) मंडळ याबाबत विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही तारखेला उक्त सेवायोजनात काम करीत असलेल्या किंवा काम करीत होते अशा कामगारांमधून कोणत्याही नवीन प्रवर्गातील कामगारांची नोंदणी करण्यात येईल. परंतु, अशा बाबतीत वैद्यकीयदृष्ट्या कामगार पात्र असेल आणि त्याचे वय ६० वर्षांपेक्षा अधिक नसेल.

(२) या योजनेत कोणत्याही तरतुदी समाविष्ट करण्यांत आल्या असल्या तरी जर मंडळाच्या मते कामगाराने त्याच्या अर्जात चुकीची माहिती देऊन किंवा त्यात आवश्यक असलेली माहिती उघड न करता नोंदणी मिळवली आहे, किंवा कामगारांची चुकीच्या पद्धतीने किंवा चुकीची नोंदणी करण्यात आली आहे तर मंडळाला नोंदवहीतून त्या कामगाराचे नाव काढून टाकण्याचा निर्देश देता येईल :

परंतु, असा निदेश देण्यापूर्वी प्रस्तावित निदेश का देण्यात येऊ नये याबाबतची कारणे दाखविण्याची एक संधी मंडळ अशा कामगाराला देईल.

१६. **नोंदणीकृत कामगारांची बढती आणि बदली.**––(१) कार्यगट नोंदवहीतील नोंदणीकृत कामगारांच्या कोणत्याही प्रवर्गातील (प्रासंगिक रिक्त पदाखेरीज) रिक्त पद सर्वसाधारणपणे त्या टोळीमधील लगेच (गँग) खालच्या प्रवर्गातील नोंदणीकृत कामगारांना बढती देऊन भरण्यात येईल.

(२) नोंदणीकृत मासिक कामगारांच्या कोणत्याही प्रवर्गातील (प्रासंगिक रिक्त पदाखेरीज) रिक्त पद, टोळीमधील (गँग) नोंदणीकृत मासिक कामगारांच्या खालच्या प्रवर्गातून केवळ बढती देऊन भरण्यात येईल, किंवा जर त्याच टोळीमधील नोंदणीकृत मासिक कामगाराच्या खालच्या प्रवर्गातील कोणताही नोंदणीकृत कामगार बढतीसाठी योग्य वाटत नसेल तर, त्याच टोळीमधील त्याच किंवा वरिष्ठ प्रवर्गातील नोंदणीकृत कामगाराची बदली करून नोंदणीकृत मालक किंवा नोंदणीकृत मालकांचा गट यांच्याकडून कार्यगटातील वरिष्ठ प्रवर्गातील कामगाराची निवड करता येईल.

स्पष्टीकरण.–– सर्वसाधारणपणे पदोन्नतीसाठी पुढील निकष असतील :––

(अ) ज्येष्ठता,

(ब) ज्या प्रवर्गासाठी पदोन्नती द्यावयाची आहे त्या प्रवर्गासाठी गुणवत्ता व योग्यता,

(क) मागील सेवेचा अभिलेख.

टीप.––एकाच प्रवर्गातील कार्यगट नोंदणीकृत मासिक नोंदणीकडे किंवा त्याचप्रमाणे मासिक नोंदणीतून कार्यगट नोंदणीकडे केलेल्या बदलीस पदोन्नती मानण्यात येणार नाही.

(३) अध्यक्षास किंवा सचिवास, पुरेशा व वैद्यकीय कारणास्तव, नोंदणीकृत मालक किंवा नोंदणीकृत कामगार यांनी ज्या कारणांसाठी बदली हवी आहे त्या कारणांचे स्पष्टीकरण करणारी लेखी विनंती केल्यास, नोंदणीकृत मासिक कामगारांच्या कार्यगटातील बदलीस परवानगी देता देईल :

परंतु, अशी बदली, ही नोकरीच्या समाप्तीसंबंधी नोंदणीकृत मासिक कामगार आणि त्याचा नोंदणीकृत मालक यांच्यात झालेल्या कोणत्याही कराराच्या परिपूर्तीच्या अधीन असेल. अध्यक्ष किंवा सचिव यांच्या पूर्व मान्यतेशिवाय कोणतीही बदली करता येणार नाही.

(४) गैरशिस्त किंवा गैरवर्तणुकीच्या कृत्याबद्दल नोंदणीकृत मालकाकडून नोंदणीकृत मासिक कामगाराची सेवा समाप्त करण्यात आली तर, त्याला कार्यगटातील सेवायोजनासाठी मंडळाकडे अर्ज करता येईल. मंडळाने नोंदणीकृत कामगाराला नोकरी द्यावी किंवा नाही हे प्रकरणाच्या गुणवत्तेवर मंडळाच्या वतीने सचिव ठरविल आणि जर नोकरी द्यायची असेल तर, त्याच प्रवर्गात द्यायची की खालच्या प्रवर्गात द्यायची हे तो ठरवील. नोंदणीकृत कामगाराला व्यक्तिशः किंवा त्याच्या प्रतिनिधीद्वारे सुनावणीची आणि सचिवासमोर त्याची बाजू मांडण्याची एक संधी देण्यात येईल.

(५) उप खंड (३) किंवा यथास्थिती उप खंड (४) अन्वये, जर नोंदणीकृत मासिक कामगाराची कार्यगटात बदली करण्यात आली किंवा कार्यगटात त्याला नोकरी देण्यात आली तर, कार्यगटातील सर्व लाभांसाठी त्यांची पूर्वीची सेवा जमेस धरण्यात येईल. आणि नोंदणीकृत मालक, नोंदणीकृत कामगाराला त्याच्या पूर्वीच्या नोकरीतील उपार्जित झालेले सर्व लाभ जणू काही त्याची बदली झालेली नाही असे समजून मंडळाकडे हस्तांतरित करील. नोंदणीकृत मालक, नोंदणीकृत कामगार ज्याचा सदस्य असेल अशा भविष्यनिर्वाह निधीतील त्याच्या नावे कोणतीही रक्कम असल्यास, त्याच्या भविष्य-निर्वाह निधीतील अशी रक्कम आणि नोंदणीकृत कामगार व त्याचा नोंदणीकृत मालक यांच्यामध्ये झालेल्या कोणत्याही विद्यमान संविदेनुसार किंवा अशा नोंदणीकृत कामगारास लागू असलेला कोणताही कायदा, निवाडा किंवा करार या अनुसार त्याची रजा व उपदान यांबाबत त्याला देय झाली असेल अशी रक्कम जणू काही त्याची सेवा नोंदणीकृत मालकाकडून समाप्त करण्यात आली असे समजून मंडळास देईल.

१७. **वैद्यकीय तपासणी.**—(१) जर मंडळाला कामगारांची वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक वाटले तर, मंडळ नोंदणी होण्यापूर्वी नवीन कामगाराला, अध्यक्षाने या प्रयोजनासाठी नामनिर्देशित केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शारीरिक पात्रतेसाठी वैद्यकीय तपासणी, विनामूल्य करून घेण्यास भाग पाडू शकेल. वैद्यकीय अधिकाऱ्याने वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरविलेल्या कामगाराला वैद्यकीय मंडळाकडून तपासणी होण्यासाठी अध्यक्षाकडे लेखी अर्ज करता येईल आणि त्याचवेळी, याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी फी त्याच्याकडे भरता येईल. अध्यक्ष त्याच्याकडे अशी विनंती करण्यात आल्यावर एक वैद्यकीय मंडळ स्थापन करील. वैद्यकीय मंडळाचा निर्णय अंतिम असेल, आणि वैद्यकीयदृष्ट्या अपात्र असलेला कामगार नोंदणीसाठी पात्र असणार नाही.

(२) जर अध्यक्षाला तसे करणे आवश्यक वाटेले तर, तो कामगाराला अध्यक्षाकडून स्थापन करणयात यावयाच्या वैद्यकीय मंडळाकडून विनामूल्य वैद्यकीय तपासणी करून घेण्यास भाग पाडू शकेल. वैद्यकीय मंडळाचा निर्णय अंतिम असेल, आणि जर कामगार कायम स्वरूपी अपात्र असल्याचे वैद्यकीय मंडळास आढळून आले तर, अध्यक्ष ताबडतोब त्याची सेवा समाप्त करील.

१८. **नोंदणी फी.**––(१) या योजनेन्वये नोंदणी करून घेतेवेळी प्रत्येक कामगार मंडळाला एक रुपया इतकी नोंदणी फी देईल.

(२) या योजनेअन्वये नोंदणी करून घेतेवेळी प्रत्येक मालक पंचवीस रुपये इतकी नोंदणी फी देईल.

१९. **कार्डे देणे.**––(१) प्रत्येक नोंदणीकृत कामगाराला (एक) एक ओळखपत्र, (दोन) उपस्थितीपत्र, आणि (तीन) मंडळाने ठरविलेल्या नमुन्यातील वेतनचिठ्ठी देण्यात येईल.

(२) पत्रक हरविल्यास नवीन पत्रक देण्यात येईल. परंतु मंडळाकडून निश्चित करण्यात येईल असा त्या पत्राचा खर्च संबंधित नोंदणीकृत कामगाराला द्यावा लागेल.

२०. **नोंदणीकृत कामगारांचा सेवा अभिलेख.**––प्रत्येक नोंदणीकृत मासिक आणि रोजंदारीवरील नोंदणीकृत कामगारांचा, सेवा अभिलेख मंडळ विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात ठेवण्यात येईल व त्यांच्यामध्ये इतर गोष्टीबरोबरच नोंदणीकृत कामगारांविरुद्ध करण्यात आलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही, बढत्या, चांगल्या कामाबद्दल केलेल्या शिफारशी इत्यादी बाबीचा परिपूर्ण तपशील आणि मंडळाला योग्य वाटतील अशा इतर बाबी अंतभूत असतील. नोंदणीकृत मासिक कामगारांच्या बाबतीतील असे तपशील नोंदणीकृत मालकांकडून मंडळाला देण्यात येतील.

२१. **नोंदणीकृत मालकांसाठी अभिलेखपत्रे.**––आस्थापना अधिकारी मंडळाकडून तयार करण्यात यावयाच्या नमुन्यात, प्रत्येक नोंदणीकृत मालकबाबतचे अभिलेखपत्र ठेवील व त्यामध्ये इतर गोष्टीबरोबरच, नोंदणीकृत मालकांविरुद्ध करण्यात आलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा पूर्ण अभिलेख समाविष्ट असेल.

२२. **पत्रके परत करणे.**––नोंदणीकृत कामगाराचे पत्रक खालील परिस्थिती मंडळाकडे परत करण्यात येईल :—

(क) सात दिवस किंवा त्यापेक्षा अधिक दिवसांसाठी रजेवर जात असेल तेव्हा,

(ख) सेवेतून निवृत्त होत असेल तेव्हा,

(ग) सेवेतून बडतर्फ किंवा सेवामुक्त करण्यात येईल तेव्हा,

(घ) सेवेतून तात्पुरते निलंबित करण्यात येईल तेव्हा, किंवा

(ड) मरण पावल्यावर :

परंतु, नोंदणीकृत मासिक कामगारांचा नोंदणीकृत मालकदेखील वरील (क), (ख), (ग), (घ) आणि (ड) मधील परिस्थितीत नोंदणीकृत कामगारांचे पत्र मंडळाकडे परत करील.

२३. **उपस्थितीपत्र आणि वेतनचिठ्ठी यांमध्ये नोंदी.**––(१) कार्यगटातील नोंदणीकृत कामगार नोंदणीकृत मालकाकडे त्यास कामासाठी नेमून देण्यात येईल. तेव्हा त्याचे उपस्थितीपत्र मंडळाकडे देईल. मंडळ नोंदणीकृत कामगाराने केलेल्या कामाच्या कालावधीसंबंधीच्या आवश्यक त्या नोंदी

उपस्थितीपत्रात करील. आणि कामाच्या प्रत्येक दिवसाचे काम पूर्ण झाल्यावर ते पत्र त्याला परत करील. आणि मंडळ, नोंदणीकृत कामगाराने उपार्जित केलेली मजुरी दाखविणारी वेतनचिठ्ठी, शक्य तितक्या लवकर देईल.

(२) नोंदणीकृत मासिक कामगार, त्यास त्याचे काम नेमून देण्यात येईल. तेव्हा, त्याचे उपस्थिती पत्र त्याच्या नोंदणीकृत मालकाच्या स्वाधीन करील. नोंदणीकृत मालक, नोंदणीकृत कामगाराने केलेल्या कामाच्या कालावधीसंबंधीच्या आवश्यक त्या नोंदी पत्रामध्ये करील. आणि त्याला नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यावर ते पत्र त्याला परत करील. कामाच्या प्रत्येक दिवसासाठी, नोंदणीकृत मालक, नोंदणीकृत कामगाराने उपार्जित केलेली मजुरी दाखविणारी वेतनचिठ्ठी शक्य तितक्या लवकर, देईल.

२४. **नोंदणीकृत कामगारांचे सेवायोजन.**––(१) नोंदणीकृत मालक किंवा नोंदणीकृत मालकांचा गट यांना नेमून दिलेला विशिष्ट प्रवर्गाचा नोंदणीकृत मासिक कामगार, त्या नोंदणीकृत मालकाकडून किंवा नोंदणीकृत मालकांच्या गटाकडून कार्यगटातील त्याच प्रवर्गाच्या कोणत्याही नोंदणीकृत कामगारापेक्षा अधिक पसंती देऊन त्या प्रवर्गातील कामासाठी नेमला जाण्यास पात्र असेल.

(२) विशिष्ट प्रवर्गातील मासिक नोंदवहीवरील, नोंदणीकृत कामगारांची संख्या जर उपलब्ध कामासाठी पुरेशी नसेल तर, त्या प्रवर्गातील कार्यगट नोंदवहीवरील नोंदणीकृत कामगारांना नेमण्यात येईल.

(३) एका नोंदणीकृत मालकाच्या किंवा नोंदणीकृत मालकांच्या गटाच्या नोंदणीकृत मासिक कामगाराला, अध्यक्ष किंवा सचिव यांच्या पूर्वमान्यतेने असेल त्याशिवाय, कोणत्याही अन्य नोंदणीकृत मालक किंवा नोंदणीकृत मालकांचा गट कामावर नेमणार नाही.

२५. **प्रासंगिक रिक्त पदे भरणे.**––नोंदणीकृत मासिक कामगाराची प्रासंगिक रिक्त पदे खालील पद्धतीने भरण्यात येतील :––

जेव्हा मुख्य मुकादम किंवा मुकादम यास आणि तो अनुपस्थित असेल तेव्हा नोंदणीकृत मालकाच्या नोकरीतील त्याच टोळीच्या (गँग) वरिष्ठ नोंदणीकृत व्यक्तीला त्या पदावर घेऊन ते पद भरण्यात येईल.

२६. **बेकारी भत्ता.**––जेव्हा कार्यगटातील नोंदणीकृत कामगार कामासाठी उपस्थित राहील आणि ज्या कामासाठी त्याची नेमणूक झाली आहे ते काम कोणत्याही कारणामुळे सुरू किंवा उपलब्ध होऊ शकत नसेल आणि त्याच्यासाठी कोणतेही पर्यायी काम मिळू शकत नसेल आणि कामासाठी तो उपस्थित झाल्यापासून दोन तासात त्यास मुक्त करण्यात आले असेल तर, तो ज्या प्रवर्गामधील आहे त्या प्रवर्गासाठी उचित असेल अशा प्रकारे मंडळाकडून निश्चित करण्यात येईल त्या दराने नोंदणीकृत मालकाकडून बेकारी भत्ता मिळण्यास पात्र असेल. दोन तासांपेक्षा अधिक वेळ थांबवून घेतलेल्या नोंदणीकृत कामगाराला महागाई भत्त्यासह पूर्ण मजुरी देण्यात येईल.

२७. **सुट्ट्या.**––प्रत्येक नोंदणीकृत कामगार, खंड ३२ खाली मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दरांनी वर्षातून चार पगारी सुट्ट्या मिळण्यास पात्र असेल. चार सुट्ट्यांपैकी तीन सुट्ट्या (एक) २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), (दोन) १ मे (महाराष्ट्र दिन) आणि (तीन) १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन) यादिवशी असतील आणि चौथी सुट्टी मंडळाकडून ठरविण्यात येईल.

२८. नोंदणीकृत कामगारांवरील बंधने.––(१) कामासाठी उपलब्ध असलेला कार्यगटातील नोंदणीकृत कामगार, सचिवाने, अशा कामगाराला त्या मालकाकडे काम करण्यासाठी नेमून दिलेले असल्याखेरीज त्या नोंदणीकृत मालकाकडे काम करणार नाही.

(२) कामासाठी उपलब्ध असलेल्या कार्यगटातील नोंदणीकृत कामगार, मंडळाच्या निदेशांचे पालन करील, आणि,

(क) मंडळ विंनिर्दिष्ट करील अशी हजेरी केंद्रे (Call Stands) किंवा नियंत्रण केंद्रे येथे आणि मंडळ विनिर्दिष्ट करील अशा वेळी कामगार उपस्थित होईल आणि अशा संदेशाच्या ठिकाणी व नियंत्रण केंद्राजवळ उपलब्ध राहील.

(ख) नोंदणीकृत मालकाकडील, ज्या प्रवर्गात त्याची नोंद करण्यात आली आहे अशा प्रवर्गातील किंवा मंडळाने त्यास ज्या प्रवर्गासाठी योग्य ठरवलेले असेल, अशा दुसऱ्या कोणत्याही प्रवर्गातील कोणत्याही कामाचा स्वीकार करील.

(३) नोंदणीकृत मालकाकडे काम करण्यासाठी मंडळाकडून नेमणूक करण्यात आलेली असेल तेव्हा, कामासाठी उपलब्ध असलेला नोंदणीकृत कामगार, असा नोंदणीकृत मालक किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा पर्यवेक्षक यांच्या निदेशानुसार आणि ज्या ठिकाणी तो काम करीत असेल त्या अशा ठिकाणच्या नोकरीच्या नियमानुसार आपले काम पार पाडील.

(४) (क) नोंदीत कामगार कोणत्याही नोंदीत महिलेच्या कामाच्या ठिकाणी लैंगिकं छळवादाचे कोणतेही कृत्य करणार नाही.

(ख) कामाच्या ठिकाणी प्रभारी असलेला नोंदीत किंवा अनोंदीत पर्यवेक्षक मुकादम किंवा इतर कोणत्याही नावाने संबोधला जाणारा मंडळाचा नोंदीत कामगार कामाच्या ठिकाणी कोणत्याही महिलेच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करेल.

२९. नोंदणीकृत मालकांवरील बंधने.––(१) खंड २४ च्या तरतुदींच्या अधीन राहून नोंदणीकृत मालक खंड ९ (ड.) च्या तरतूदीनुसार, सचिवाने त्याला नेमून दिलेल्या नोंदणीकृत कामगाराखेरीज दुसऱ्या कोणत्याही कामगाराला कामावर ठेवणार नाही.

(२) नोंदणीकृत मालक, मंडळाकडून देण्यात येतील अशा सुचनांनुसार त्यास सध्या व भविष्यात आवश्यक असलेल्या कामगारासंबंधातील सर्व उपलब्ध माहिती सादर करील.

(३) अन्यथा निदेश दिलेला नसल्यास, नोंदणीकृत मालक उक्त्या कामांच्या दरावर नोंदणीकृत कामगाराकडून करण्यात येणाऱ्या कामाच्या भाराचे तपशील आणि त्यांच्याकडे काम करणाऱ्या नोंदणीकृत कामगारांबाबत आवश्यक असेल अशी इतर आकडेवारी मंडळाकडे सादर करील.

(४) (एक) नोंदणीकृत मालक, मंडळास प्रत्येक पंधरवड्याच्या अंतिम तारखेपासून पाच दिवसांच्या आत किंवा विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यांत येईल.

अशा कमी कालावधीत खंड ४१ (१) अन्वये देय असलेली लेव्ही (वसुली) आणि त्या पंधरवड्यात अशा नोंदणीकृत कामगारांनी केलेल्या कामादाखल नोंदणीकृत कामगारांना देय असलेली एकूण मजुरी व रोजंदारीवरील नोंदणीकृत कामगारांना देय असलेली अन्य रक्कम देईल.

(दोन) वरील उप खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत नोंदणीकृत कामगारांच्या मजुरीची रक्कम मंडळाकडे देण्यास कसूर करणारा नोंदणीकृत मालक, मंडळाने तसे आवश्यक केल्यास, मंडळाला नोंदणीकृत कामगारंना वेळेवर मजुरीचीं रक्कम देणे शक्य व्हावे म्हणून अगोदरच्या बारा कॅलेंडर महिन्यांमध्ये त्याने मंडळाकडे भरणा केलेल्या मजुरीच्या मासिक सरासरी एवढी रक्कम मंडळाकडे जमा करील. उक्त रक्कम मंडळाला सचिवाने तशा अर्थाचा आदेश दिल्याच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत मंडळाकडे जमा करण्यात येईल. जर कोणत्याही वेळी, असा प्रकारे जमा केलेली रक्कम अगोदरच्या बारा कॅलेंडर महिन्यांच्या मंजुरीच्या सरासरीपेक्षा कमी असेल तर, नोंदणीकृत मालक अशी तूट भरून काढील.

(तीन) नोंदणीकृत कामगारांच्या मजुरीची रक्कम वरील उप खंड (एक) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत भरण्यास सातत्याने कसूर करणारा नोंदणीकृत मालक, मंडळाच्या सचिवांच्या तशा अर्थाच्या आदेशाच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत करण्यात येईल. अशा, भरणा करावयाच्या रकमेच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक होणार नाही इतका अधिभार अशा रकमेवर शास्तीच्या स्वरूपात देईल.

(५) नोंदणीकृत मालक, मंडळाला आवश्यक वाटेल असा अभिलेख ठेवील, आणि मंडळासमोर किंवा मंडळ पदानिर्देशित करील अशा व्यक्तीसमोर योग्य सुचनादिल्यानंतर असा सर्व अभिलेख आणि नोंदणीकृत कामगार व अशा कामगारांची ज्या कामासाठी नेमणूक करण्यात आली असेल असे काम यांच्याशी संबंधित असलेले इतर कोणतेही दस्तऐवज सादर करील, आणि मंडळाने किंवा मंडळाच्या वतीने काढलेली कोणतेही सूचना किंवा दिलेले निदेश यांमध्ये दिलेल्या बाबींशी संबंधित अशी माहिती पुरवील.

(६) ज्या योजनेखाली नोदणीकृत मालक उक्त कसूर करण्यास जबाबदार असेल अशा योजनेखाली इतर कोणतेही कारवाई करण्याच्या मंडळाच्या अधिकारास बाधा येऊ न देता, जर अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत मालकाने त्याची देय रक्कम भरली नाही तर, त्याला करण्यात येणारा नोंदणीकृत कामगारांचा पुरवठा स्थगित करण्यात येईल. अशा आशयाची नोटीस नोंदणीकृत मालकावर बजावण्यात येईल. नोटीशीचा कालावधी संपल्यानंतर. नोंदणीकृत कसूरदार मालकास करण्यात येणारा नोंदणीकृत कामगारांचा पुरवठा तो सर्व थकबाकीची रक्कम भरीपर्यंत स्थगित करण्यात येईल.

(७) (क) नोंदीत मालक किंवा त्याची प्राधिकृत प्रतिनिधी किंवा पर्यवेक्षक कोणत्याही नोंदीत महिला कामगारांच्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवदाचे कृत्य करणार नाही.

(ख) कामाच्या ठिकाणी असलेला नोंदीत मालक किंवा त्याचा प्राधिकृत प्रतिनिधीं किंवा पर्यवेक्षक कोणत्याही महिलेच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करेल.

३०. **सेवा योजनावरील निर्बंध.**—(१) कोणताही मालक, कोणताही कामगार नोंदणीकृत कामगार असल्याखेरीज त्या कामगाराला कामावर ठेवणार नाही.

(२) उप खंड (१) मध्ये काहीही अंतभूत केलेले असले तरी,--

(क) जर सचिवाची अशी खात्री झाली असेल की–काम निकडीने करण्याची आवश्यकता आहे, आणि त्या कामासाठी नोंदणीकृत कामगार मिळविणे हे कोणत्याही प्रकारे शक्य नसेल त्याबाबतीत मंडळाने घातलेल्या कोणत्याही मर्यादांच्या अधीनतेने नोंदणीकृत मालकाला नोंदणीकृत कामगार नसलेल्या कामगाराला नोकरी देण्यास सचिव परवनगी देऊ शकेल :

परंतु नोंदणी न झालेले कामगार कामावर ठेवायचे असतील अशा प्रत्येक वेळी, सचिव, शक्य असल्यास, अशा कामगारांना कामावर ठेवण्यासाठी अध्यक्षाची पूर्वमान्यता मिळवील, आणि जेव्हा हे शक्य नसेल तेव्हा अशा कामगारांना ज्या परिस्थितीमध्ये नोकरी देण्यात आली त्या परिस्थितीची संपूर्ण माहिती २४ तासांच्या आत अध्यक्षाला देईल. आणि अध्यक्ष पुढील बैठकीच्या वेळी अशा सेवायोजनांसंबंधी मंडळाला रीतसर माहिती देईल.

(ख) मंडळास, ते विनिर्दिष्ट करील अशा शर्तीच्या अधीनतेने सुट्टीच्या दिवशी करण्याची आवश्यकता भासल्यास, सुट्टीच्या दिवशी, असे काम करण्यासाठी नोंदणीकृत कामगार जेवढ्या संख्येने उपलब्ध नसतील तेवढ्या संख्येतील नोंदणी न झालेल्या कामगारांना कामावर ठेवण्याची परवानगी देता येईल.

(ग) (क) आणि (ख) याबाबीमध्ये निर्देशित केलेल्या प्रकरणी, नोंदणीकृत मालकाने पूर्वोक्तप्रमाणे कामावर ठेवलेल्या व्यक्तीना खंड २९ (४), (५), व (६) आणि खंड ३२ च्या प्रयोजनांसाठी त्या कामाच्या बाबतीत जणूकाही त्या रोजंदारीवरील व्यक्ती आहेत असे समजण्यात येईल.

(३) त्या कार्यगटातील नोंदणीकृत कामगारास त्याने खंड २८ खालील दायित्वे पूर्णपणे पार पाडली असल्यास, मंडळाने ज्या दिवशी त्याला काम पुरविले नाही त्या दिवशी इतरत्र काम करता येईल.

३१. **ज्या परिस्थितीमध्ये ही योजना लागू असण्याचे बंद होईल अशा परिस्थिती.**---(१) या योजनेच्या तरतुदीनुसार कामगार नोंदवहीतून नोंदणीकृत कामगाराचे नाव काढून टाकण्यात येईल. तेव्हापासून त्या नोंदणीकृत कामगारास ही योजना लागू असण्यासे बंद होईल.

(२) या योजनेतील तरतूदीनुसार मालकांच्या नोंदवहीतून नोंदणीकृत कामगाराचे नाव काढून टाकण्यात येईल तेव्हापासून त्या नोंदणीकृत मालकासाठी ही योजना लागू असल्याचे बंद होईल.

(३) या खंडातील कोणतीही बाब अशा व्यक्ती नोंदणीकृत कामगार किंवा नोंदणीकृत मालक असताना तिने कोणत्याही वेळी पार पाडलेली कोणतीही दायित्वे, किंवा उपार्जित केलेले अधिकार यास बाधक ठरणार नाहीत.

३२. **नोंदणीकृत कामगारांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती.**--(१) कोणत्याही निवाड्याच्या तरतुदींना बाधा न येता, या योजनेत, अन्यथा विनिदेशपूर्वक तरतूद केली नसल्यास, वेतनाचे दर भत्ते आणि अतिकालिक भत्ते, कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, पगारी रजा, आणि सेवेच्या

इतर शर्ती याबाबत नोंदणीकृत कामगार (कार्यगटातील किंवा मासिक नोंदवहीवरील) आणि नोंदणीकृत मालक यांच्यात झालेल्या कराराची ध्वनित शर्त ही, कामगारांच्या प्रत्येक प्रवर्गासाठी मंडळ निश्चित करील अशी असेल. मात्र, उप खंड (२), (३), (४), (५) आणि (६) च्या तरतुदीच्या अधीन असेल.

(२) नोंदणीकृत कामगारांच्या वेतनाचे दर, भत्ते आणि अतिकालीन भत्ते आणि कामाचे तास, विश्रांतीच्या वेळा, पगारी रजा, आणि सेवेच्या इतर शर्ती (यात यापुढे ज्यांचा निर्देश सामुदायिकरीत्या '' सेवेच्या शर्ती '' असा करण्यात आला आहे.) निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्याचे पुनरीक्षण करण्यासाठी किंवा त्यात फेरबदल करण्यासाठी मंडळ, या योजनेखालील नोंदणीकृत मालकांच्या संघटनांना आणि नोंदणीकृत कामगारांच्या श्रमिक संघांना नोंदणीकृत कामगारांच्या बाबतीत, या योजनेखाली निश्चित करण्यात येतील किंवा सुधारण्यात येतील किंवा फेरबदल करण्यात येतील. अशा सेवेच्या शर्तीच्या संबंधात योग्य वाटतील अशी अभिवेदने करण्यासाठी फर्माविल. जर नोंदणीकृत मालकांची अशी संघटना आणि नोंदणीकृत कामगारांचा असा श्रमिक संघ अस्तित्वात नसेल तर, मंडळास योग्य वाटेल अशा रितीने नोटीस प्रसिद्ध करून त्यामार्फत नोंदणीकृत मालक आणि नोंदणीकृत कामगार यांना असे अभिवेदन करण्यासाठी बोलावण्यात येईल.

(३) अशा प्रकारचे प्रत्येक अभिवेदन हे लेखी असेल आणि मंडळ विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत ते करण्यात येईल. आणि त्यात नोंदणीकृत मालकाची पूर्वोक्तप्रमाणे वेतन देण्याची क्षमता किंवा सेवेच्या शर्तीचे अनुपालन किंवा अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीशी संबंधित असेल. अशी इतर कोणतीही परिस्थिती लक्षात घेऊन अभिवेदन करणाऱ्या व्यक्तीच्या मते वाजवी असतील अशा सेवेच्या शर्ती नमूद करण्यात येतील.

(४) मंडळ, उपरोक्त अभिवेदन, कोणतेही असल्यास, विचारात घेईल आणि मंडळासमोर आलेल्या सर्व महत्त्वपूर्ण गोष्टींचे परीक्षण केल्यानंतर, नोंदणीकृत कामगारांच्या सेवेच्या संबंद्ध शर्ती निश्चित करील किंवा त्यांचे पुनरीक्षण करील किंवा, यथास्थिती, त्यात फेरबदल करील.

(५) नोंदणीकृत कामगारांच्या सेवेच्या शर्ती निश्चित करण्यासाठी, किंवा त्यांचे पुनरीक्षण करण्यासाठी किंवा, यथास्थिति, त्यात फेरबदल करण्यासाठी मंडळ, राहणीं खर्च स्थानिक क्षेत्रांमधील सेवायोजनांच्या तुलनेत सेवेच्या प्रचलित शर्ती, नोंदणीकृत मालकाची वेतन देण्याची क्षमता, आणि मंडळाशी संबद्ध वाटेल अशी इतर कोणतीही परिस्थिती लक्षात घेईल.

(६) मंडळाने निश्चित केलेल्या पुनरीक्षित केलेल्या किंवा, यथास्थिती फेरबदल करण्यात आलेल्या सेवेच्या शर्ती मंडळ ठरविल अशा तारखेपासून किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील. मंडळाचा निर्णय मंडळाला योग्य वाटेल अशा रितीने नोंदणीकृत कामगार व नोंदणीकृत मालक यांना कळविण्यात येईल.

३३. **नोंदणीकृत कामगारांना वेतन व इतर भत्ते यांचे संवितरण करणे .**——मंडळास, नोंदणीकृत मालकांना, त्यांनी थेट नियुक्त केलेल्या नोंदणीकृत मासिक कामगारांना या योजनेखाली प्राधिकृत करण्यात येईल अशी आणि वसुलीयोग्य रवकम वजा केल्यानंतर वेतन व इतर भत्ते देण्याची परवानगी

देता येईल. वेळोवेळी नोंदणीकृत मालकांनी नियुक्त केलेल्या नोंदणीकृत मासिक कामगारांखेरीज अन्य नोंदणीकृत कामगारांच्याबाबतीत, नोंदणीकृत मालकांकडून देय असलेले वेतन व इतर भत्ते, नोंदणीकृत मालकांकडून धनादेशाद्वारे प्रत्येक पंधरावड्याला मंडळाच्या सचिवाकडे पाठविण्यात येतील. त्यानंतर, सचिव, प्रत्येक महिन्याच्या विनिर्दिष्ट दिवशी नोंदणीकृत कामगारांना या योजनेखाली त्यांच्याकडून वसूल करावयाच्या रकमा वजा करून, वेतन व इतर देय रकमा कोणत्याही असल्यास, त्यांचे संवितरण करण्याची व्यवस्था करील.

३४. **शिस्तभंगाची कार्यवाही.**--(१) (एक) आस्थापना अधिकाऱ्यास नोंदणीकृत मालक या योजनेच्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर करीत आहे अशी तक्रारीच्या स्वरूपात किंवा अन्य स्वरूपात माहिती मिळाल्यावर त्या प्रकरणाचा तपास केल्यानंतर त्या नोंदणीकृत मालकाला लेखी ताकीद देता येईल.

(दोन) आस्थापना अधिकाऱ्याच्या मते, आस्थापना अधिकारी असे प्रकरण अध्यक्षाला कळविल. जेणेकरून त्यानंतर अध्यक्षास योग्य वाटेल अशाप्रकारे पुढील तपास करण्याची तजवीज करता येईल आणि त्या मालकासंबंधी त्यास खालीलपैकी कोणतीही उपाययोजना करता येईल, म्हणजे त्यास,--

(क) त्याच्यावर एखादा दोषारोप करता येईल आणि त्या दोषारोपाची नोंद त्याच्या अभिलेखपत्रिकेत करता येईल, किंवा

(ख) मंडळाच्या मान्यतेच्या अधिनतेने आणि नोंदणीकृत मालकाला एक महिन्याची लेखी नोटीस दिल्यानंतर, मालकांच्या नोंदवहीतून त्याचे नाव, तात्पुरते किंवा कायमचे काढून टाकता येईल.

(२) कार्यगटातील नोंदणीकृत कामगार, या योजनेच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर करील किंवा गैरशिस्ताची किंवा गैरवर्तणूकीची कोणतीही कृती करील तर, आस्थापना अधिकाऱ्याला त्याबाबत लेखी माहिती कळविण्यात येईल. त्यानंतर आस्थापना अधिकाऱ्यास, त्या प्रकरणी तपास केल्यानंतर, अशा कामगाराला लेखी ताकीद देता येईल किंवा चार दिवसांपेक्षा अधिक नाही एवढया कालावधीसाठी त्याला निलंबित करता येईल.

(३) आस्थापना अधिकाऱ्याच्या मते, उप खंड (२) मध्ये तरतूद केलेल्या शिक्षेपेक्षा वाढीव स्वरूपातील शिक्षा उचित असेल तेव्हा, तो हे प्रकरण अध्यक्षास कळविल.

(४) पोट-कलम (३) अन्वये आस्थापना अधिकाऱ्याकडून किंवा नोंदणीकृत मालकांकडून किंवा कोणत्याही इतर व्यक्तीकडून लेखी अहवाल आल्यानंतर कार्यगटातील नोंदणीकृत कामगार या योजनेच्या कोणत्याही तरतुदीचे पालन करण्यात कसूर करीत असेल किंवा गैरशिस्तीची किंवा गैरवर्तणुकीची कोणतीही कृती करीत असेल किंवा उत्पादनाचा दर्जा किंवा आधारसामग्री सादर करण्यात सतत कसूर करीत असेल किंवा अन्य कोणत्याही प्रकारे अकार्यक्षम ठरत असेल तर, अध्यक्षास, योग्य वाटेल अशा प्रकारे पुढील तपासणी करता येईल किंवा तपासणी करण्याची तजवीज

करता येईल. आणि त्यानंतर, संबंधीत कामगाराच्या संबंधात पुढीलपैकी कोणतीही उपाययोजना करता येईल. म्हणजेच, त्याला खालीलपैकी कोणतीही शास्ती लादता येईल.–

(क) त्याला लेखी ताकीद देता येईल;

(ख) त्याला चार दिवसांपेक्षा अधिक नाही एवढ्या कालावधीसाठी निलंबित करता येईल;

(ग) एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर त्याच्या सेवा समाप्त करता येतील किंवा त्याऐवजी महागाई भत्यासह एका महिन्याचे वेतन देऊन सेवा समाप्त करता येईल; किंवा

(घ) सेवेतून पदच्युत करता येईल.

(५) या खंडान्वये कोणतीही कारवाई करण्यापूर्वी, त्याच्याविरुद्ध प्रस्तावित कारवाई का करण्यात येऊ नये याबाबतचे कारण दाखविण्याची एक संधी संबंधित व्यक्तीला देण्यात येईल.

(६) वरील उप खंड (२) आणि (४) अन्वये तपासणी प्रलंबित असताना, संबंधित नोंदणीकृत कामगारास अध्यक्षाकडून निलंबित करता येईल.

(७) खंड ३५ अन्वये अध्यक्षाच्या अधिकाराला हानी न पोहोचविता, नोंदणीकृत मालकाला त्याच्याकडे काम करीत असलेल्या मासिक नोंदणीकृत कामगारांविरुद्ध शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचे सर्व अधिकार असतील.

३५. **अध्यक्षाचे शिस्तभंगविषयक विशेष अधिकार.**–– (१) या योजनेत काहीही अंतर्भूत असले तरी, चौकशीअंती अध्यक्षाचे असे मत झाले की, नोंदणीकृत कामगाराच्या कोणत्याही गटाचे किंवा कोणत्याही नोंदणीकृत कामगाराने " मंदगती " कामाचा अवलंब केला आहे आणि त्याच गटाकडून किंवा दुसऱ्या गटाच्या नोंदणीकृत कामगारांकडून किंवा कामाच्या त्याच ठिकाणी किंवा वेगवेगळ्या ठिकाणी तेच काम करणाऱ्या नोंदणीकृत कामगारांकडून तसे करण्याचे चालू ठेवण्यात आले आहे किंवा त्याची पुनरावृत्ती होत आहे तर अध्यक्षास त्याबाबतचे अधिकथन तयार करता येईल.

(२) उप खंड (१) अन्वये जेव्हा अधिकथन तयार करण्यात येईल तेव्हा, अध्यक्षाने पुढील गोष्टी करणे कायदेशीर असेल :–

(एक) नोंदणीकृत मासिक कामगाराच्या बाबतीत, नोंदणीकृत मालकांच्या अधिकारांना बाधा येऊ न देता त्याला योग्य वाटेल अशाप्रकारे अशा नोंदणीकृत कामगाराविरुद्ध त्यांना सेवेतून दूर करण्याच्या कार्यवाहीसह त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करणे, आणि

(दोन) कार्यगटातील नोंदणीकृत कामगाराच्या बाबतीत, अध्यक्षाला, योग्य वाटेल अशाप्रकारे अशा नोंदणीकृत कामगारांविरुद्ध पदच्युतीसह शिस्तभंगाची कार्यवाही करणे.

(३) (एक) जेथे एखाद्या गटाकडून " मंदगती कामा " चा अवलंब केला जातो तेथे त्या गटामधील सर्व सदस्यांवर, आणि

(दोन) जेथे एखाद्या नोंदणीकृत कामगारांकडून व्यक्तिशः '' मंदगती कामाचा '' अवलंब केला जातो तेथे असा संबंधित कामगारावर अध्यक्ष शिस्तभंगाचो कारवाई करू शकेल.

(४) या खंडाखाली कोणत्याही नोंदणीकृत कामगाराविरुद्ध किंवा कोणत्याही नोंदणीकृत कामगाराच्या गटाविरुद्ध कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करण्यापूर्वी अशा नोंदणीकृत कामगाराला किंवा कामगाराच्या गटाला त्याच्याविरुद्ध किंवा त्या गटाविरुद्ध प्रस्तावित कारवाई का करण्यात येऊ नये, याबाबतचे कारण दाखविण्याची एक संधी देण्यात येईल :

परंतु, अध्यक्षाला, या उप खंडान्वये कारण दाखविण्याची एक संधी देण्यापूर्वी, उप खंड (१) अन्वये अधिकथन करण्यात आल्यावर ताबडतोब कोणत्याही नोंदणीकृत कामगाराला किंवा नोंदणीकृत कामगारांच्या गटाला कामावरून निलंबित करता येईल.

(५) नोंदणीकृत कामगार किंवा नोंदणीकृत कामगारांचा गट यांच्याकडून ''मंदगती कामाचा '' अवलंब करण्यात आला असल्याबद्दलचे अध्यक्षाकडून करण्यात आलेले अधिकथन, हे अंतिम असेल आणि कोणत्याही परिस्थितीत त्याला हरकत घेण्यात येणार नाही.

३६. **सेवा समाप्त करणे.**––(१) या योजनेच्या तरतुदींना अनुसरून असेल त्या खेरीज; कार्यगटातील नोंदणीकृत कामगारांची सेवा समाप्त करण्यात येणार नाही.

(२) कार्य गटातील नोंदणीकृत कामगार, मंडळाला चौदा दिवसांची नोटीस दिल्याखेरीज किंवा त्याऐवजी महागाई भत्यासह पंधरा दिवसांचे वेतन अर्पण केल्याखेरीज, नोंदणीकृत मालकाकडे करीत असलेली आपली सेवा समाप्त करणार नाही.

(३) जेव्हा नोंदणीकृत कामगारांची मंडळाकडील सेवा, उप खंड (१) आणि (२) अन्वये समाप्त करण्यात येईल तेव्हा, मंडळ ताबडतोब नोंदवहीतून किंवा अभिलेखातून त्याचे नाव काढून टाकील.

३७. **नोंदणीकृत कामगारांनी केलेली अपिले.**––(१) या उप खंडात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, एखाद्या प्राधिकरणाने खंड ३४ अन्वये काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेला कार्यगटातील नोंदणीकृत कामगारास, आस्थापना अधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध अध्यक्षाकडे आणि आणि अध्यक्षाच्या आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे एक अपील सादर करता येईल.

(२) सचिवाच्या––,

(एक) नोंदवहीत किंवा अभिलेखात विशिष्ट गटात कामगाराला नेणाऱ्या, किंवा

(दोन) खंड १५ अन्वये नोंदणी नाकारणाऱ्या, किंवा

(तीन) तो कामगार ज्या प्रवर्गातील आहे त्या प्रवर्गातील नसलेले कोणतेही काम करण्यास खंड २८(४) (ख) अन्वये त्याला फर्माविणाऱ्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही नोंदणीकृत कामगाराला अध्यक्षाकडे अपील करता येईल.

(३) खंड १६ (४) खालील एखाद्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही नोंदणीकृत कामगाराला अध्यक्षांकडे अपील करता येईल.

(४) जर, नोंदणीकृत कामगार, ज्याची नावे त्या वर्गातील कामगारांची संख्या कमी करण्यासाठी नोंदवहीतून किंवा अभिलेखातून काढून टाकली आहेत अशा वर्गात येतो, असे कारण असेल तर, मंडळाकडून देण्यात आलेल्या सूचनांना अनुसरून नोंदणीकृत कामगाराचे नाव नोंदवहीतून किंवा अभिलेखातून काढून टाकण्याची वाजवी नोटीस देण्यात आली असेल तर, त्याबाबतीत अपील सादर करण्यात येणार नाही:

परंतु , मंडळाच्या सूचनेत निर्दिष्ट करण्यात आलेल्या नोंदणीकृत कामगाराच्या वर्गात किंवा त्या वर्णनात आपण येत नाही असे तो कामगार अभिकथित करत असेल त्याबाबतीत नोंदणीकृत कामगार अध्यक्षाकडे अपील करील.

(५) उप खंड (१), (२), (३) किंवा (४) मध्ये निर्दिष्ट केलले प्रत्येक अपील लेखी असेल आणि ज्या आदेशाविरुद्ध ते करायचे आहे तो आदेश मिळाल्याच्या तारखेपासून चौदा दिवसांचा आत असे अपील करण्यात येईल;

मात्र, अपील प्राधिकरण, अभिलेखित करावयाच्या कारणासाठी, चौदा दिवसांची मुदत समाप्त झाल्यानंतर केलेले अपील दाखल करून घेईल.

३८. **नोंदणीकृत मालकांनी केलेली अपिले.**––(१) (एक) आस्थापना अधिकाऱ्याच्या खंड ३४ (१) (दोन) खालील आदेशामुळे व्यथित झालेल्या नोंदणीकृत मालकाला अध्यक्षांकडे अपील करता येईल.

(दोन) खंड ३४ (१) (दोन) (ख) खालील एखाद्या आदेशाविरुद्ध अपील केलेले असेल त्याबाबतीत, अध्यक्ष, असे प्रकरण ताबडतोब राज्य शासनाकडे पाठवील. राज्य शासन अशा अपिलावर त्याला योग्य वाटेल असा आदेश देईन.

(२) उप खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेले प्रत्येक अपील लेखी असेल आणि ज्या आदेशाविरुद्ध ते करायचे आहे तो आदेश मिळाल्याच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत असे अपील करण्यात येईल:

परंतु, अपील प्राधिकरण अभिलेखित करावयाच्या कारणांसाठी चौदा दिवसांची मुदत समाप्त इ. झाल्यानंतर केलेले अपील दाखल करून घेईल.

३९. **अध्यक्षाला असलेले पुनरीक्षणाचे अधिकार.**––या योजनेमध्ये काहीही अंतभूत असले तरी, आस्थापना अधिकाऱ्यांकडून खंड ३४ खाली एखादा आदेश संमत करण्यात आलेला असल्यास, अध्यक्षाला कोणत्याही वेळी, आस्थापना अधिकाऱ्याने अशा ज्या कोणत्याही कार्यवाहीत तो आदेश संमत केला असेल त्या कार्यवाहीचा अभिलेख, त्याची वैधता किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, मागवून घेता येईल, आणि त्यासंबंधात त्याला योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु, अध्यक्ष या खंडाखाली, कोणत्याही व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज त्या व्यक्तीच्या हिताला बाधक ठरेल असा कोणताही आदेश देणार नाही.

४०. **विशिष्ट अपिलांच्या प्रकरणी आदेश स्थगित करणे.**––एक महिन्याची नोटीस देऊन देण्यात आलेल्या सेवा समाप्तीच्या आदेशाविरुद्ध खंड ३७ च्या तरतूदीनुसार नोंदणीकृत कामगाराने अपील केले असेल त्याबावतीत, किंवा खंड ३४ (१) (दोन) (ख) अन्वये मालकांच्या नोंदवहीतून त्याचे नाव काढून टाकण्याबाबतच्या आदेशाविरुद्ध खंड ३८ च्या तरतूदीनुसार नोंदणीकृत मालकाने अपील केले असेल त्याबाबतीत अध्यक्षाला, अपील प्राधिकाऱ्यास त्या अपीलावर सुनावणी होईपर्यंत आणि असे अपील निकालात निघेपर्यन्त, अशा अपिलावरील आदेशाचे प्रवर्तन निलंबित करता येईल.

४१. **योजना चालविण्यासाठी येणारा खर्च आणि नोंदणीकृत कामगारांच्या सुखसोयी आणि फायदे यासाठी तरतूद.**––(१) योजना चालविण्यासाठी आणि अधिनियमात आणि या योजनेसाठी तरतूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत कामगारासाठी विविध फायदे, सुविधा व सुखसोयी यांची तरतूद करण्यासाठी येणारा खर्च नोंदणीकृत मालकानी मंडळाला दिलेल्या रकमातून भागविण्यात येईल. प्रत्येक नोंदणीकृत मालक, त्याला नेमून देण्यात आलेल्या आणि त्याच्याकडे कामावर लावलेल्या नोंदणीकृत कामगारांच्या बाबतीत मंडळ जाहीर नोटीशीद्वारे किंवा लेखी आदेशाद्वारे नोंदणीकृत मालकांना वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे आणि मंडळ निदेश देईल त्या रीतीने व त्यावेळी लेव्हीच्या रूपाने मंडळाला अशी लेव्हीची रक्कम देईल. मंडळास, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे भूतलक्षी प्रभावाने किंवा भविष्यलक्षी प्रभावाने कराची रक्कम देण्यास नोंदणीकृत मालकांना भाग पाडता येईल.

(२) ज्या मालकाला ही योजना लागू आहे असा मालक, मंडळाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, त्याला ही योजना लागू करण्यात आल्याच्या तारखेपासून त्याने या योजनेच्या खंड १४ मध्ये घालून दिलेल्या वेळेत किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, स्वतःची नोंदणी करून घेतली आहे किंवा नाही हे विचारात न घेता लेव्ही देईल.

(३) उप खंड (१) अन्वये नोंदणीकृत मालकाने किती प्रदान भरावयाचे ते ठरविण्यासाठी मंडळाला नोंदणीकृत कामगारांच्या कामाच्या वेगवेगळ्या प्रवर्गासाठी लेव्हीचे वेगवेगळ्या दर निश्चित करता येतील, परंतु, सारख्याच परिस्थितीतील सर्व नोंदणीकृत मालकासाठी लेव्हीचा एकच दर लागू होईल अशा रीतीने तो निश्चित करण्यात येईल.

(४) मंडळ, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय दैनंदिन समय वेतन दराच्या आधारावर गणना केलेल्या अंदाजित एकूण वेतन देयकाच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक होणारी कोणतीही लेव्ही मंजूर करणार नाही.

(५) नोंदणीकृत मालक मागणी केल्यावर ठेवीच्या स्वरूपात मंडळाकडे पैसे भरील किंवा उप खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेचा योग्य भरणा करण्यासाठी मंडळाला आवश्यक वाटेल अशा दुसऱ्या प्रतिभूतीची तरतूद करील.

(६) सचिव, वेळोवेळी, या योजनेच्या प्रवर्तनाशी आणि वित्तव्यवस्थेशी संबंधित वाजवीरीत्या आवश्यक असेल अशी आकडेवारी आणि इतर माहिती मंडळाला सादर करील.

(७) नोंदणीकृत मालकाने उप खंड (१) अन्वये त्यांच्याकडून देय असलेले प्रदान. मंडळाक विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मुदतीत भरण्यात कसूर केली तर, सचिव नोटीस मिळाल्य तारखेपासून तीन दिवसांच्या आत त्याने देय रक्कम भरली नाही तर, त्याला करण्यात ये नोंदणीकृत कामगारांचा पुरवठा स्थगित करण्यात येईल अशा आशयाची नोटीस त्या नोंदणी मालकावर बजाविल. नोटिशीचा कालावधी संपल्यानंतर, सचिव कसुरदार नोंदणीकृत मालकाने भरेपर्यन्त त्याला करण्यात येणारा. नोंदणीकृत कामगारांचा पुरवठा स्थगित करील.

४२ **भविष्यनिर्वाह निधी आणि उपदान.**––(१) मंडळ नोंदणीकृत कामगारांकरिता अंशदाना भविष्यनिर्वाह निधीची तरतूद करण्यासाठी नियम तयार करील आणि त्यांचे प्रवर्तन करील. या निय अंशदानाचे दर, प्रदान करण्याची रीत व पद्धत आणि आवश्यक अशी इतर प्रकरणे यांसाठी त करण्यात येईल. तथापि, अंशदानाचा दर नोंदणीकृत कामगारांच्या वेतनाच्या ६ टक्क्यांपेक्षा कमी अ कामा नये आणि तसेच, अशा वेतनाच्या ८ टक्क्यांपेक्षा तो अधिकही असता कामा नये:

परंतू नियम तयार होईपर्यंत मंडळाने, अंशदानाचे दर आणि त्याचा भरणा करण्याची रीत व प निश्चित करणे विधिग्राह्य असेल.

(२) अंशदानात्मक भविष्यनिर्वाह निधीचे नियम तयार करताना, मंडळ, कर्मचारी भविष्यनिर्वाह f अधिनियम, १९५२ (१९५२ चा एकोणीस) याच्या, तरतुदी आणि त्या अधिनियमान्वये कोणत आस्थापनेसाठी करण्यात आलेल्या योजना विचारात घेईल.

(३) मंडळ नोंदणीकृत कामगारांना उपदान देण्यासाठी नियम करील.

(४) नोंदणीकृत कामगारांना उपदान देण्यासाठी नियम करताना मंडळ, उपदान प्रदान अधिनि १९७२ (१९७२ चा एकोणचाळीस) याच्या तरतुदी विचारात घेईल.

(५) भविष्यनिर्वाह निधी आणि उपदान यांबाबत मंडळाने केलेले नियम राज्य शासना पूर्वमान्यतेच्या अधीन असतील.

४३. **शिक्षा.**––जो कोणी, खंड १४, २९ आणि ३० च्या तरतुदीचे उल्लंघन करील त्य अपराधसिद्धीनंतर, पुढील शिक्षा होईल :––

(क) जर ते पहिले उल्लंघन असेल तर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावास किंवा पाचशे रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

(ख) जर ते नंतरचे उल्लंघन असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावास किंवा पाचशे रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्हीही शिक्षा होतील.

(ग) आणि अशा नंतरच्या अपराधानंतरही असे उल्लंघन चालूच राहिले तर, उक्त उल्लं चालू असेपर्यंत, प्रत्येक दिवसासाठी शंभर रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होई

५६ महाराष्ट्र शासन राजपत्र, असा., जानेवारी १०, २००८/पौष २०, शके १९२९ [भाग एक-ल

नमुना ''अ ''

(खंड १४ पहा)

मालकांच्या नोंदणीसाठी अर्ज

यवतमाळ जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ

नोंदणी क्रमांक..................

(कार्यालयाने भरावयाचा)

मी, मालक म्हणून नोंदणीसाठी याद्वारे अर्ज करीत आहे. आवश्यक तपशील खाली देण्यात येत आहे :–

१. आस्थापनेचे नाव व पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक

२. भागीदारी संस्था किंवा कंपनी असल्यास, मालकाचे नांव

(१) .. ..

(२) .. ..

(३) .. ..

(४) .. ..

३. तुम्ही कोणत्या संघटनेचे सभासद आहांत काय ? असल्यास, संघटनेचे नाव नमूद करावे.

४. तुमच्या आस्थापनेची मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अन्वये नोंदणी करण्यात आली आहे काय ? असल्यास नोदणी क्रमांक नमूद करावा.

५. तुमचा आस्थापनेचा व्यापार/धंदा यांच्याशी संबंधात माल भरणे, उतरवणे, रचणे, वाहून नेणे, इत्यादी, कामे ज्या ठिकाणी करण्यात येतात अशा कामाच्या ठिकाणांचा स्थितिस्थानासह तपशील.

६. तुम्ही कंत्राटदारामार्फत कामगार कामावर लावला काय ? असल्यास, कंत्राटदाराचे नाव नमूद करावे.

७. तुम्ही टोळीमार्फत कामगार कामावर लाबला काय? असल्यास टोळीच्या/टोळीच्या मुकादमाचे/मुकादमांचे नाव किंवा सर्व कामगारांची नावे व त्यांची संख्या नमूद करावी.

दिनांक अर्जदाराची सही

ठिकाण

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

चं. रा. गोसावी,

शासनाचे उप सचिव.